# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०४/२०२५ (गुरूवार)**


---

## मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या १०० दिवसांच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस विविध परवान्यांच्या फाइल ट्रॅकिंगसाठी क्युआर कोड ( QR Code) स्कॅनिंग,सुविधा सुरू करणार आहेत.

मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या १०० दिवसांच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात कामकाजामध्ये पारदर्शकता आणि नागरिकांसाठी सुविधा वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, नागपूर ग्रामीण जिल्हयातील २२ पोलीस स्टेशन मध्ये **पेट्रोल पंप परवाना,रॅली परवानगी, फटाका विक्री परवाना, शस्त्र परवाना नुतनीकरण, स्पोटक साठा परवाना** च्या फाइल ट्रॅकिंगसाठी क्युआर कोड स्कॅनिंग सुविधा प्राथमिक टप्प्या मध्ये सुरू करण्यात येणार आहे. या नवीन वैशिष्ट्यामुळे नमुद परवान्यासाठी अर्जदारांना त्यांच्या अर्जाची प्रगती आणि सध्याचे स्थान त्यांच्या घरातून किंवा कार्यालयातून सहजपणे ट्रॅक करता येणार आहे.

परवाना ट्रॅकिंगसाठी अधिक कार्यक्षम आणि सुलभ प्रणालीची गरज ओळखून, नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी हे अनुकूल ऑनलाईन साधन विकसित केले आहे. एकदा लागू झाल्यानंतर, अर्जदारांना त्यांचा परवाना अर्ज दाखल केल्यावर एक ट्रॅकींग आयडी मिळेल. सदर ट्रॅकींग आयडी हा संबधीत पोलीस स्टेशनने प्रदान केलेला क्युआर कोड ला स्कॅन करून ट्रॅक करता येईल. तसेच नागपूर ग्रामीण जिल्हा पोलिसांच्या अधिकृत वेबसाईट nagpurgraminpolice.gov.in या वर लिंक द्वारे ट्रॅक करता येईल. याद्वारे अर्जदारांना पोलीस विभागातील त्यांच्या अर्जाची स्थिती आणि स्थान याबद्दल तात्काळ माहीती मिळेल.सदर उपक्रमामुळे अर्जदारांची वेळेची बचत होवुन त्यांना प्रत्यक्ष भेटी आणि फोनवरून चौकशीची आवश्यकता भासणार नाही.

या उपक्रमाचा उद्देश परवाना अर्जाची प्रक्रिया सुव्यवस्थित करणे आणि अदयावत करून अर्जदारांना सुलभता प्रदान करणे आहे. नागपूर ग्रामीण जिल्हा पोलिसांच्या सुधारित नागरी सेवांसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आणि त्यांच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्याबाबतचा एक उत्कृष्ट उपक्रम आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १ आरोपी अटक ,एकुण ४० लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कामगिरी

दिनांक १७/०४/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान उपविभाग हे त्यांच्या पथकासह पोलीस स्टेशन मौदा परीसरात अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोंलिंग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भंडारा ते नागपुर रोड वर भंडारा कडुन **हायवा ट्रक क्र. एम. एच. ४० सी. टी. २४१०** ने अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री संतोष गायकवाड यांनी त्यांच्या पथकांसह **मौजा मथनी शिवारातील शाहु ढाबा समोर नाकाबंदी** केली असता ,नाकाबंदी दरम्यान हायवा ट्रक क्र. एम. एच. ४० सी. टी. २४१० हा भंडारा कडुन येतांना दिसला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **अरूण ईस्तारी मते, वय ५४ वर्षे , रा. गोपवाडा, शहापुर, जि भंडारा** हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक **पंकज प्रभुदास धुर्वे,रा. नेरी, ता. मोहाडी, जि. भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये आणि २) हायवा ट्रक क्र. एम. एच. ४० सी. टी. २४१० किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण ४०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२), ३(५), ४९ , ३(५)भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **आरोपीला चालकाला पोलीसांनी अटक केली आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## १४ जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक १७/०४/२०२५ रोजी मौदा पोलीस ,पोलीस स्टेशन हद्‌दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा कडुन नागपुर कडे **बोलोरो पिकअप एम. एच. ४० सी.डी ६०३५** मध्ये कत्तलीकरीता अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **स्वप्नील धाबा समोर वडोदा शिवार एन.एच ५३ रोडवर** नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान भंडारा कडुन संशयीत बोलोरो पिकअप एम. एच. ४० सी.डी ६०३५ येताना दिसले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत ईशारा केला असता चालकाने वाहन रोडच्या कडेला लावुन त्याचा साथीदार वाहक याच्या सह पोलीसांना थांबलेले पाहुन अंधाराचा फायदा घेवुन दुरूनच पळ काढला. पोलीसांनी वाहनाजवळ जावुन त्याची तपासणी केली असता त्यामध्ये **१४ गोवंश जनावरे** (८ गायी आणि ६ गोऱ्हे) असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही

चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलोरो पिकअप एम एम एच ४० सी.डी ६०३५ किंमती ७ ,००,०००/— रूपये. व १४ गोवंश जनावरे किंमती १,४०,००० /— रूपयाचा एकुण किंमती ८,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**बोलोरो पिकअप एम. एच. ४० सी.डी ६०३५ चा चालक,वाहक आणि मालक याच्या विरूध्द कलम ११(१) (ड) (ई) (एफ) प्रा.छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक खापरखेडा पोलीस ,नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक १७/०४/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, रूपचंद उर्फ कंटर जगन्नाथ रविदास रा. वार्ड क्र ५, दहेगाव रंगारी ता सावनेर जि. नागपुर हा **चनकापुर येथे वार्ड क्र. ६, हनुमान मंदीराजवळ** अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी नामे **रूपचंद उर्फ कंटर जगन्नाथ रविदास,वय ३७ वर्षे रा. वार्ड क्र ५, दहेगाव रंगारी, ता.सावनेर, जि. नागपुर** याला ताब्यात घेतले आणि नमुद आरोपीचे ताब्यातुन **२२८.५ ग्राम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा पिशवीसह किंमती ६,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

आरोपी नामे रूपचंद उर्फ कंटर जगन्नाथ रविदास,वय ३७ वर्षे रा. वार्ड क्र ५, दहेगाव रंगारी ता.सावनेर, **जि. नागपुर** याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास खापरखेडा पोलीस करत आहे.**आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन रामटेक** :—दिनांक १६/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस , पोलीस स्टेशन पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारकडुन खबर मिळाली की, मौजा मरारवाडी गावाकडुन मनसर कडे एका ट्रक मध्ये अवैधरित्या विनापरवाना मुरूमाची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मरारवाडी येथे रोडवर नाकाबंदी केली असता संशयीत **ट्रक क्रमांक एम.एच ४० एन ४२७८** असा दिसुन आला. सदर वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात मुरूम आढळुन आला. **वाहन चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता स्वप्नील सुरेश नागपुरे ,वय २५ वर्षे, पत्ता. बोराडा ता. रामटेक, जि. नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर मुरूमाची अवैध वाहतुक **वाहन मालक भगवान संतोष मात्रे , रा मरारवाडी, ता.रामटेक जि.नागपुर** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) वाहना मधुन २ ब्रास मुरूम किंमती ६,०००/— रूपये आणि २) वाहन — ट्रक क्रमांक

एम.एच ४० एन ४२७८ किंमती १०,००,०००/—रूपये असा **एकुण १०,०६,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**वरील नमुद वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने